दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३५३ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.७ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते बळीराजा मोफत वीज योजनेची अंमलबजावणी

## २७५० कोटी रुपये महावितरणला अदा, शेतकऱ्यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण

छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे २ हजार ७५० कोटी रुपयांचे वीजबिल सरकारने महावितरणला अदा केले. तसेच पावतीचे वितरण आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत आस्थापित कृषिपंपाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले.




### साठ हजार पंपाचे लोकार्पण

यावेळी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बटण दाबून आतापर्यंत शेतात बसविलेले ६० हजार सौर कृषी पंप रिमोटद्वारे चालू करून योजनेचे लोकार्पण केले.

यावेळी शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपांचे चालू बिल भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. आगामी पाच वर्षे सरकार शेतकऱ्यांचे साडेसात एचपीपर्यंतच्या पंपांचे चालू बिल भरेल असा शासन निर्णय जारी झाला आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. सरकारने एप्रिल ते जून या कालावधीच्या बिलापोटी २ हजार ७५० कोटी रुपये महावितरणला अदा केल्यामुळे शेतकऱ्यांना महावितरणकडून पावत्या पाठविण्यात येत आहेत.

### दहा लाख पंप देणार – फडणवीस

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत राज्यातील शेतकऱ्यांना दहा लाख पंप देण्यात येणार आहेत. केवळ दहा टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनल्स आणि कृषी पंप मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के भरावा लागेल. उर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. शेतकऱ्यांना स्वतंत्र आणि हक्काचे सिंचनाचे साधन सौर कृषी पंपामुळे मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना २५ वर्षे वीजबिल नाही. पाच वर्षांत पंप बिघडला तर दुरुस्त करून मिळणार आहे. तसेच चोरीस गेला किंवा मोडतोड झाला तर त्याचा विमा सरकारने काढला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत आजतागायत २ लाख ८ हजार ९३५ सौर पंप मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी १ लाख ६७ हजार १५५ शेतकऱ्यांनी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे. त्यापैकी ६० हजार सौर पंप आस्थापित करण्यात आले आहेत. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वाधिक पंप या जिल्ह्यात आस्थापित करण्यात आले आहेत.

## पुणे–सोलापूर हायवेवर अपघात ;६३ वर्षीय नवनाथ ठवरे यांचा मृत्यू

इंदापूर । प्रतिनिधी




पुणे–सोलापूर हायवेवर दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ४.०० च्या सुमारास डाळज नंबर २ येथे पिकप आणि टू व्हिलर यांच्यात झालेल्या भयंकर अपघातात वरकुटे खुर्द येथील ६३ वर्षीय नवनाथ पिराजी ठवरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ ठवरे टीव्हीएस कंपनीच्या स्टार सिटी टू व्हिलर गाडी (नंबर: एम एच ४२ / ए जी / १२९९) घेऊन डाळज चौकातून सोलापूर लेनवर जात होते. यावेळी पुणे–सोलापूर बाजूकडून भरधाव वेगाने येणारी महिंद्रा पिकप गाडी (नंबर: एम एच ४५ / एफ / ५४६२) चालक विकी मारुती थोरात यांच्या ताब्यात होती. पिकप गाडीने ठवरे यांना पाठीमागून जोरात धडक दिली आणि त्यामुळे ते फरपटत गेले. या अपघातात ठवरे यांना डोक्याला, पोटाला, आणि पायाला गंभीर तसेच किरकोळ दुखापत झाली, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून भरधाव गाडी चालवत असताना ठवरे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला चालक विकी मारुती थोरात याविरुद्ध भिगवण पोलीस स्थानकात कायदेशीर तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रार नवनाथ ठवरे यांचे भाऊ तानाजी पिराजी ठवरे यांनी दिली आहे.

I प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार मिसाळ करत आहेत. या अपघातामुळे पुणे–सोलापूर हायवेवर वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कठोर पावले उचलावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. हा अपघात वाहतूक सुरक्षेसाठी एक गंभीर इशारा आहे. त्यामुळे वाहनचालकांनी प्रत्येक वेळी वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना टाळता येऊ शकतील.

## तिसऱ्या आघाडीमुळे माझी झोप उडाली, आता आमचे कसे होणार ?:शरद पवार यांचा संभाजीराजे छत्रपतींना टोला

मुंबई । वृत्तसंस्था

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होणार आहे. मात्र यातच राज्यांमध्ये परिवर्तन महाशक्ती नावाने तिसरी आघाडी स्थापन करण्यात आली आहे. शेतकरी नेते राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू यांच्यासह युवराज संभाजीराजे छत्रपती यांचा या तिसऱ्या आघाडीत समावेश आहे. या तिसऱ्या आघाडीचा आगामी विधानसभा निवडणुकीवर परिणाम होईल का? असा प्रश्न शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना विचारण्यात आला होता. यावर त्यांनी खोचक शब्दात प्रतिक्रिया दिली आहे. या तिसऱ्या आघाडीचा नक्कीच परिणाम होईल, माझी तर झोप गेलीये, आम्ही भयंकर अस्वस्थ आहोत. अशा शब्दात पवारांनी या तिसऱ्या आघाडीला टोला लगावला आहे.या संदर्भात बोलताना शरद पवार यांनी संभाजीराजे छत्रपती यांच्यावर देखील टीका केली आहे. संभाजीराजे यांच्यासारखे महान घराण्यातील लोक या तिसऱ्या आघाडीत आहेत. यामुळे नक्कीच परिणाम होईल. असे शरद पवार यांनी म्हटले आहे. तिसऱ्या आघाडीमुळे आमची झोप उडाली आहे. आम्ही सगळे भयंकर अस्वस्थ आहोत. आता आमचे काय होणार? असा प्रश्न



आमच्या समोर उपस्थित झाला आहे. असा टोला शरद पवार यांनी लगावला आहे.राज्यामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीला पर्याय म्हणून तिसऱ्या आघाडीकडे पाहिले जात आहे. तिसऱ्या आघाडीमध्ये शेतकरी नेते राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू यांच्यासह युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या पक्षाचा देखील समावेश आहे. संभाजीराजे छत्रपती यांनी निवडणूक आयोगाकडे नुकतीच आपल्या पक्षाची नोंदणी केली आहे. या संदर्भात या तिसऱ्या आघाडीची प्रमुख बैठक छत्रपती संभाजीनगर येथे झाली होती. या बैठकीतच त्यांनी तिसऱ्या आघाडीची घोषणा करण्यात आली आहे. या तिसऱ्या आघाडीला परिवर्तन महाशक्ती असे नाव देण्यात आले आहे. या आघाडीच्या माध्यमातून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याची घोषणा देखील करण्यात आली आहे.

## धुबधुबी तलाव उजनीच्या पाण्याने तातडीने भरून घ्या

अक्कलकोट । वृत्तसंस्था

अक्कलकोट तालुक्यातील दक्षिण भागात यावर्षी अतिशय कमी पाऊस झाला आहे. शिरवळसह आठ गावांचा पाणीपुरवठा अवलंबून असलेले जेऊर भागातील धुबधुबी तलाव कोरडे पडले आहे. दिवाळीनंतर तर पाण्याची परिस्थिती गंभीर बनत जाणार आहे, याचा विचार करून उजनीचे पाणी धुबधुबी तलावात तातडीने सोडण्याची आग्रही मागणी कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन करण्यात आली. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सिद्धेश्वर कारखाना अध्यक्ष धर्मराज काडादी,वळसंग सूत गिरणी चेअरमन राजशेखर शिवदारे, माजी जि.प सदस्य मल्लिकार्जुन पाटील, आनंद बुक्कानुरे यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते. यावर्षी पावसाळा अत्यल्प झाल्याने जेऊर व परिसरातील गावासाठी वरदायीनी असलेले शिरवळ येथील धुबधुबी तलाव पावसाळा संपत आल्यावरही हा धुबधुबी प्रकल्प कोरडा असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता आहे. सध्या कुरनूर धरणात तुळजापूर तालुक्यातून मोठा पाण्याचा प्रवाह येत आहे. तो तूर्त कमी करून सुरुवातीला रामपूर तलाव भरून घेऊन तेथून हणमगांव तलाव भरून पाणी खाली सोडल्यास रस्त्यातील अनेक गावांची सोय होऊन धुबधुबी तलाव भरून पाण्याची अडचण दूर य होईल. त्यासाठी पाणी सोडणे आवश्यक आहे असे शिष्टमंडळाचे म्हणणे आहे.

## जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प:पंतप्रधान मोदींच्या हस्ते पोहरादेवीत लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या ५ सोलर पार्कचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी येथे करण्यात आले.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू असून ते टप्प्या टप्प्याने सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. त्यापैकी धोंदलगाव (जिल्हा छत्रपती संभाजीनगर), बामणी बुद्रक (जिल्हा नांदेड), हरोली (जिल्हा कोल्हापूर), जलालाबाद (जिल्हा अकोला), पलशी बुद्रुक (जिल्हा बुलढाणा) या एकूण १९ मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण आज झाले. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीस मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना पंतप्रधानांच्या हस्ते २०.५५ कोटी रुपये विकासनिधी ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला.

४८०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीसाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन राज्यात शेतीसाठी पूर्णपणे होऊन विजेचा पुरवठा होईल. या योजनेत एकाच हेतूने राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून अशा विकेंद्रित स्वरुपातील हा जगातील सर्वात मोठा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. योजनेच्या अनुषंगाने राज्यात शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीजनिर्मिती कंपनी स्थापन करण्यात आली आहे.एप्रिल २०२३ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला मंजुरी दिल्यानंतर राज्याचा ऊर्जा विभाग आणि महावितरणने केवळ अकरा महिन्यात ४० हजार एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जा निर्मितीसाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण करणे, वीज खरेदीचे करार करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे आणि विकसकांना ९२०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मितीची लेटर ऑफ वॉर्ड देणे ही कामे केली.खासगी गुंतवणूकदारांकडून एकूण ६५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार असून ग्रामीण भागात ५० हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. सध्याच्या साडे आठ रुपये प्रती युनिट दराच्या ऐवजी सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दराने वीज उपलब्ध होणार असल्याने वीज खरेदीमध्ये दरवर्षी १० हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी राज्य सरकारवरील वार्षिक ४५०० कोटी रुपये अनुदानाचा व उद्योगांवरील वार्षिक १३ हजार कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा दूर होईल. तसेच हरित ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होईल.



# चला झाडे लावूया!

**वृक्ष आणि मानव यांच्यातील नाते अद्वितीय आहे. मानवी जीवनात ऑक्सिजनचे काय महत्त्व आहे? हे जर जाणून घ्यायचे असेल तर कोविडच्या काळातील परिस्थिती आठवून बघा. ऑक्सिजनच्या सिलेंडरसाठी आपल्याला किती धावपळ करावी लागत होती. तो उपलब्ध न झाल्याने अनेकांना मरणाच्या दारात उभे केले ही वास्तविकता आहे. जेव्हा पेशंट दवाखान्यात जातो आणि फुकट मिळणारा ऑक्सिजन हजारो रुपये खर्चुन विकत घेतो. तेव्हा या ऑक्सिजनचे महत्त्व कळते. मग निसर्गाचा समतोल राखणाऱ्या लाखो रुपयांचा ऑक्सिजन विनामूल्य देणाऱ्या झाडांचे महत्त्व आपण कधी समजून घेणार?**

ऑक्सिजन हा सजीव सृष्टीचा श्वास आहे. तुकाराम महाराजांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे असे म्हणत वृक्षांचे महात्म्य वर्णन केले. झाडांना सगेसोयरे संबोधून सोयरीकीच्या नात्यात जोडले. त्यातून झाडे आणि मानवी जीवन यातील महात्म्य सहज लक्षात येते.मानवी जिवनात नातेवाईक आणि सगेसोयरे जसे आवश्यक आहेत. त्यापेक्षा वृक्ष हे मानवी जीवनात आवश्यक आहे. परंतु अलीकडे स्वार्थापोटी आपण या वृक्षांना विसरत चाललो आहोत. एकीकडे सिमेंटची जंगले वाढवत आहोत. त्यासाठी झाडांची अवैधपणे कत्तल सुरू आहे. ही कत्तल मानवी जीवन धोक्यात आणणार आहे. बदलत्या तापमानावरून लक्षात यायला लागले. आता सृष्टीचे चक्रच बदलून गेले आहे. वेळीअवेळी कधीही पावसाळा, कधीही उन्हाळा, कधीही हिवाळा सुरू झाला आहे. पूर्वी हे तिनही ऋतू नियमितपणे असायचे. आता निसर्गाचे चक्र बदललेले आहे. याला मानवी स्वार्थ, शासनाची इच्छाशक्ती, प्रशासनातील अर्थकारण कारणीभूत आहे. सतत वाढणाऱ्या तापमानावर नियंत्रण मिळविण्यासाठी वृक्षलागवड आणि प्रामाणिक संवर्धन काळाची गरज आहे.

शासनाने जर मनामध्ये आणले आणि प्रामाणिक अंमलबजावणी केली तर हे सहज साध्य आहे. राज्यकर्ते वृक्ष लागवड गांभीर्याने घेत नाही. विविध कारणांसाठी ज्या अधिकारवाणीने झाडे तोडत आहे मग लावत का नाही? अवैध वृक्षकटाई थोपवत का नाही? वृक्ष लगवड व संवर्धनासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.अन्यथा भविष्यात निसर्ग मानव जातीला कधीही माफ करणार नाही. निसर्गाला ओरबाडून काढण्याचे काम थांबवले पाहिजे. अजूनही वेळ गेलेली नाही.असे सांगितले जाते की, जागतिक कीर्तीचे थोर समाजसेवक बाबा आमटे यांना आनंदवन उभारताना मोठ्याप्रमाणात वृक्षतोड करावी लागली होती.पण त्यांनी जेवढी झाडे तोडली त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक झाडे नव्याने लावली आणि मुख्य म्हणजे जगवली. परिणामतः आज आनंदवनात सगळीकडे हिरवळच हिरवळ दिसते. हिरव्यागार आनंदवनातील वृक्षलागवडीचा आदर्श वृक्षप्रेमींनी घेतला पाहिजे. विकासाच्या नावाखाली जेवढी झाडे तोडतो त्यापेक्षा दुपटीने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन झाले तरच मानव जातीचे भवितव्य सुरक्षित आहे. अन्यथा वृक्षांविना मणसांचे भवितव्य काय राहील? हे सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाहीं. मागील आठवड्यात अचानक वाढलेले तापमान हे पुढे घडणाऱ्या भविष्यकाळाची नांदी आहे. दिवसेंदिवस पृथ्वीचे तापमान वाढतच आहे. मानवी शरीराला सहन न होणारे उष्णतेचे चटके धोक्याची घंटा आहे. मानवी शरीराला सहन होणार नाही इतके उष्णतामान वाढेल अशी भीतीही वर्तवली जात आहे. तेव्हा शासनाने आतातरी वृक्षलागवडी संदर्भात गंभीर होण्याची गरज आहे. राजकीय पक्षांनी निवडणुका आल्या की साड्या आणि कपडे




वाटण्यापेक्षा पावसाळ्यात वृक्षाची रोपटे वाटण्याचा उपक्रम हाती घेतला पाहिजे.

जागरूक नागरिक म्हणून थोडे आपलेही कर्तव्ये आहेत. साऱ्या गोष्टी शासनच करेल या भ्रमात राहू नये. नागरिकांनीही शक्य तितकी झाडे लावण्याचा आणि जगवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वृक्ष लागवड ही केवळ फोटोसेशन व सोशल मीडिया पुरता इव्हेंट न ठरता त्याचे संवर्धन गांभीर्याने घेतले पाहिजे. अनेकदा केवळ फोटो काढण्यापुरते वृक्ष लावले जातात आणि वृक्ष लागवडीची नौटंकी केली जाते. आता वाढत्या तापमानाचा विचार करता गांभीर्याने मनावर घेणे आवश्यक आहे. लाडक्या लेकराबाळांप्रमाणे झाडांना जगवणे मानवी जीवनासाठी आवश्यक झाले आहे. शासनाने ३३ कोटी झाडे लावण्याचा दावा केला.मग ल ही झाडे गेली कुठे? ती रस्त्यावर किंवा मैदानात दिसत का नाही? वृक्षलागवडीची अंमलबजावणी प्रामाणिकपणे झाली असती तर कदाचित आज चित्र वेगळे दिसले असते. रस्त्यावर पांथस्तांना झाडाची सावली सहज मिळाली असती. ती शोधण्याची गरज भासली नसती. जिकडे तिकडे हिरवळ दिसली असती. परंतु दुर्दैवाने मरगळ दिसतं आहे. युद्धपातळीवर



शासनाने एखादी पंचवार्षिक योजना केवळ आणि केवळ वृक्ष लागवडीसाठी राबवून तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी करायला पाहिजे. मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी समर्पित भावनेने वृक्ष लागवड हाच पर्याय उरलेला आहे. निसर्गाशी खेळ करू नका.अशीच उदासीनता कायम राहिली तर भविष्य काळात निसर्ग कधीही माफ करणार नाही अशी भिती व्यक्त केली जात आहे.

### विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळाच्या

## पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांची भव्य उपस्थिती

**सोलापूर। प्रतिनिधी**

करमाळा येथे विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, निमगांव (टें), ता. माढा यांच्या वतीने आयोजित विठ्ठलराव शिंदे आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळा - २०२४, करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार संजय शिंदे यांच्या हस्ते पार पडला.



या कार्यक्रमात माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, ह.भ.प. सामाजिक कार्यकर्ते ड. बाबुरावजी हिरडे, प्राचार्य महेंद्र कदम, करमाळा अर्बन बँकेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, माजी सभापती बाबुराव गायकवाड, लव्हे गावचे सरपंच विलासदादा पाटील, भोसे गावचे सरपंच भोजराज सुरवसे, पत्रकार धनंजय मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार, केम गावचे गोरख पारखे, माजी जि.प. उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, बोरगांवचे माजी सरपंच विनय ननवरे, मांगी गावचे चेअरमन सुजीततात्या बागल, जिल्हा लेबर फेडरेशनचे संचालक मानसिंग खंडागळे, आशिष गायकवाड, लिंबेवाडी गावचे सरपंच किरण फुंदे, रोपळे गावचे उपसरपंच श्रीपाद दवळे, डॉ. राहुल कोळेकर, प्रविणदादा पाटील यांची उपस्थिती होती.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात तालुक्यातील पुरस्कार प्राप्त शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी पालकही उपस्थित होते. आमदार संजयमामा शिंदे यांनी शाळांच्या प्रगतीसाठी आणि शिक्षणाच्या क्षेत्रातील कार्यासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाची सांगता एकत्र येऊन शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे यावर झाली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना एक उत्तम भविष्य मिळेल याची आशा व्यक्त करण्यात आली.

## ११.७० लाखांच्या विकास कामांचे भूमिपूजन

### युवा नेते दिग्विजय बागल यांचे नेतृत्व

**सोलापूर। प्रतिनिधी**

तालुक्यातील निमगाव (ह) येथील रोकडे वस्ती आणि भोसले वस्ती येथे सिंगल फेज वीज पुरवठा सुरू करण्यासाठी ७.५० लाख रुपये, तसेच निमगाव हवेली येथील ग्रा. मा.क्र. २३८ लक्ष्मण नीळ सर घर ते टकले/ जगदाळे वस्ती या रस्त्यांचे खडीकरण करण्यासाठी ४.०० लाख रुपये, तसेच भारत जगताप व पोपट जगताप वस्तीवर सौर पथ दिवे बसवण्यासाठी एकूण ११.७० लाख रुपये निधी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य आणि युवा नेते दिग्विजय बागल यांनी मंजूर केला आहे.



या सर्व विकास कामांचे भूमिपूजन दिग्विजय बागल व ज्येष्ठ नागरिक भानुदास भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास श्री. मकाई सह साखर कारखान्याचे चेअरमन दिनेश भांडवलकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी दादा जगताप, आदिनाथ सह साखर कारखान्याचे माजी संचालक नामदेव भोगे, श्री. मकाईचे संचालक राजेंद्र मोहोळकर, संचालक पै. अनिल शिंदे, माजी सरपंच धर्मराज जगताप, माजी उपसरपंच विठ्ठल जगदाळे, सोसायटीचे चेअरमन अतुल नीळ, संचालक विठ्ठल लोहार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने, निमगाव हवेली येथील सर्व ग्रामस्थांनी बागल कुटुंबाच्या पाठीशी गेल्या अनेक वर्षांपासून खंबीर साथ दिली आहे, आणि यापुढे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विक्रमी मताधिक्य मिळवून देणार असल्याची ग्वाही सतीश नीळ, श्री. मकाईचे संचालक, यांनी दिली. या कार्यक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये विकास कार्याबद्दल सकारात्मक भावना व्यक्त होत असून, येणाऱ्या काळात अधिक विकासकामे हाती घेतली जातील, याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## सरकारच्या धोरणामुळे ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत बालाजी पाटील बाभळीकर

**नांदेड। प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने ऊस गाळप कारखाने १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा आदेश दिल्यामुळे हदगाव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सामान्यतः १५ ऑक्टोबरला सुरू होणारे कारखाने यावर्षी तब्बल महिनाभर उशिराने सुरू होणार असल्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत, अशी माहिती शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष बालाजी पाटील बाभळीकर यांनी दिली.



बाभळीकर म्हणाले की, राज्यातील शेतकरी सोयाबीन, कापूस, आणि ऊस पिकांवरील नैसर्गिक संकटांचा सामना करत आहे. पुरामुळे ऊस पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. असे असतानाही शेतकऱ्यांना ऊस गाळप सुरू होण्याची आशा होती, मात्र सरकारच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे.

शेतकरी संघटनांच्या मते, ऊस गाळप उशिरा सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागेल. १५ नोव्हेंबरनंतर ऊस गाळप सुरू झाल्यामुळे ऊसाचे वजन घटेल, तर कारखानदारांना अधिक रिकवरी मिळेल. याशिवाय, ऊस तोड कामगारांची मागणी वाढल्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

पुरामुळे ऊस पिकांवर लोकरी किड आणि पिवळ्या रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वाढत्या तापमानामुळे कामगारांवरचा ताण वाढेल आणि ऊस तोडणीमध्ये अडथळे निर्माण होतील, ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल.

शेतकरी संघटनेने असा आरोप केला आहे की, विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन ऊस गाळप उशिरा सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. ऊस तोड कामगारांना मतदानाच्या वेळी परत आणण्यासाठी सरकारने हा आदेश जारी केला असल्याचे ते म्हणाले. जर ऊस तोड कामगार तेलंगणामध्ये रोजगारासाठी स्थलांतरित झाले, तर महाराष्ट्रातील ऊस तोडणी प्रक्रिया आणखी विलंबित होऊ शकते.

शेतकरी संघटनेने सरकारकडे ऊस गाळप लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना अधिक नुकसान होऊ नये आणि कामगारांचा तुटवडा भासू नये. सरकारने शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे बालाजी पाटील बाभळीकर यांनी सांगितले.

## बोगस प्लॉट विक्री प्रकरणी बिल्डर कैलास पवारवर गुन्हा दाखल

**बिडकीन। प्रतिनिधी**

पैठण रोडवरील बिडकीन ग्रामपंचायतीच्या हद्दीत २०१२ साली श्रद्धा नगर नावाने बोगस प्लॉट विक्री केल्याप्रकरणी बिल्डर कैलास नानासाहेब पवार यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचे प्रकरण ओमप्रकाश नथुप्रसाद जैस्वाल यांनी बिडकीन पोलीस ठाण्यात दाखल केले आहे.

ओमप्रकाश जैस्वाल, वय ५६, हे बिडकीनच्या पैठण रोडवर २०१२ साली कैलास पवार याच्याकडून प्लॉट्स खरेदी करण्यात आले होते. पवार याने जैस्वाल यांना गट नं-८२३ चा जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेला एन ए लेआउट दाखवला, तसेच ग्रामपंचायत बिडकीनचा ८अ चा उतारा, प्लॉटिंगचा नकाशा आणि आदीत्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्सच्या तर्फे कैलास पवार याचा सात बारा दाखविला. यामुळे जैस्वाल यांनी ६ जानेवारी २०१२ रोजी पैठण रोडलगत प्लॉट क्रमांक २९ च्या रजिस्ट्रीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी केली.




त्यानंतर, १२ डिसेंबर २०१२ रोजी प्लॉट क्रमांक २७ आणि १८ डिसेंबर २०१२ रोजी प्लॉट क्रमांक २८ च्या रजिस्ट्रीसाठीही नोंदणी करण्यात आली. मात्र, ७ डिसेंबर २०२३ रोजी तहसिलदार पैठण यांची नोटीस आली, ज्यात त्यांना कळवण्यात आले की, संबंधित प्लॉटची जागा सरकारी रस्त्यावर येत असल्याने रस्ता मोकळा करणे आवश्यक आहे. बाबाबत माहिती घेतल्यानंतर समजले की, कैलास पवार याने बिडकीन गट नं-८२३ मधील प्लॉट्स विकत घेतल्यामुळे जैस्वाल यांना फसवणूक केली आहे. तहसिलदार व त्यांच्या पथकाने रस्ता मोकळा करण्यासाठी केलेल्या कारवाईदरम्यान, पवार यांनी जैस्वाल यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

### सरकारी क्षेत्रातील गैरव्यवहार

**जैस्वाल यांनी पवार यांच्यावर आरोप केला आहे की, त्यांनी सरकारी जागा विकली असून, याबाबत त्यांना माहीत असूनही रजिस्ट्री केली. बिडकीन पोलीस ठाण्यात या प्रकरणी जैस्वाल यांच्या तक्रारीवरून कैलास पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणामुळे बिडकीनमध्ये बोगस प्लॉट विक्रीच्या वाढत्या घटनांवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी या प्रकारच्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

## बेलोरा विमानतळाची दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी

**अमरावती। वृत्तसंस्था**

बेलोरा विमानतळावरील टर्मिनल इमारतीचा लोकार्पण सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. दरम्यान शनिवारी (दि. ५) पंतप्रधान नरेंद्र मोदी वाशीम जिल्ह्यातील पोहरा देवी येथे आले होते. त्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी शनिवारी दुपारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार गेले होते. त्यासाठीच दोन्ही उपमुख्यमंत्री बेलोरा विमानतळावर उतरले. त्यावेळी या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बेलोरा विमानतळाची पाहणी केली आहे. या वेळी आ. रवी राणा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित होते.अमरावती विमानतळावरून आगामी काळात ७२ प्रवाशी क्षमतेचे विमान उडण्याची शक्यता आहे. दरम्यान विमानतळावरील टर्मिनल इमारतीचे काम पूर्ण झाले असून, इतर बहुतांश कामे अंतिम टप्प्यात आहेत. दरम्यान शनिवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पोहरादेवी येथे जाण्यापूर्वी विमानतळावर टर्मिनल बिल्डिंग, धावपट्टी, रस्ते व इतर सर्व सोयी सुविधांच्या कामासंदर्भात पाहणी केली. तसेच विमानतळ परिसरातील वन्यप्राण्यांचा तातडीने बंदोबस्त लावून संपूर्ण परिसर सुरक्षित करण्याचा आदेश वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

# स्व.डॉ.सच्चिदानंद मुनगंटीवार मेमोरीयल महाराष्ट्र मिनी स्टेट बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन

## जिल्ह्यातील खेळाडूंच्या प्रगतीसाठी सदैव तत्पर-ना.सुधीर मुनगंटीवार




### पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्यामुळेच जिल्ह्यात उत्तम क्रीडा सुविधा : जिल्हाधिकारी गौडा

**जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या भक्कम पाठपुराव्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात उत्तम क्रीडा सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. येथील खेळाडू राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकावेत, अशी अपेक्षा आहे.**

**मुनगंटीवार म्हणाले, खेळाडूंनी शांत आणि संयमी राहून खेळात प्रगती करावी. पंचाचा निकाल प्रतिकूल असला तरी संयम बाळगणे आवश्यक आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अत्याधुनिक बॅडमिंटन हॉल आणि स्टेडियम उभारले गेले असून, येथील खेळाडूंना सर्वोत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी शासन नेहमीच पाठीशी उभे राहील.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय आणि ऑलिम्पिक स्तरावर चमकावे, यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत. जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अधिकाधिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा निर्धार आहे, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर येथील बॅडमिंटन हॉलमध्ये जिल्हा बॅडमिंटन विकास असोसिएशनच्या वतीने स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार मेमोरीयल महाराष्ट्र मिनी स्टेट बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करताना पालकमंत्री मुनगंटीवार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, जिल्हा बॅडमिंटन विकास असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश चांडक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू माधवी काशीकर हेडाऊ यांचा पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन निशा मेहता यांनी केले तर आभार जोवेल चांदेकर यांनी मानले.




# पुलगाव ग्रामीण रुग्णालयाच्या दुसऱ्या इमारतीचे भूमिपूजन

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव ग्रामीण रुग्णालयाच्या दुसऱ्या इमारतीचे भूमिपूजन आमदार *रणजित कांबळे* यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या नवीन इमारतीमध्ये अतिरिक्त १० बेडची व्यवस्था तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य उपलब्ध होणार आहे. यामुळे पुलगाव परिसरातील रुग्णांना बाहेर जाऊन उपचार घेण्याची आवश्यकता राहणार नाही, आणि त्यांना सर्व प्राथमिक उपचार इथेच मिळणार आहेत.या प्रकल्पासाठी आमदार रणजित कांबळे यांनी सातत्याने पाठपुरावा करत १.३० कोटी रुपये विशेष निधी मंजूर करून दिला आहे. लवकरच इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन रुग्णांसाठी ही इमारत जीवनदायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.




भूमिपूजनाच्या या सोहळ्याला पुलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच, कार्यक्रमाला काँग्रेसचे कृषी उत्पन्न समिती अध्यक्ष मनोज वसू, सुनील ब्राह्मणकर, रमेश सावरकर, बहादूर चौधरी, मुन्ना सीदिकी, विशाल धोपटे, प्रमोद घालनी, शंकर खंडागळे, मोला शरीफ, मुन्ना शुक्ला, प्रशांत शहागडकर, रवी केशरवानी, दीपक छालिवाल, शाबीर कुराशी, मुस्ताक भाई, गोविंद दैया, दीपक आहुजा, बंटी सोनी, संजय दाबाडे, रमेश शर्मा, राजेंद्र रवाले, अश्विन शाह, आणि जाकीर भाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छतेचा कोपरा आणि प्रथमोपचार पेटींची निर्मिती

**वर्धा । प्रतिनिधी**

इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, वर्धा येथील समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. सिद्धांत ढोके यांच्या मार्गदर्शनाखाली सालोड हिरापूर येथील जिल्हा परिषद कन्या शाळा, जिल्हा परिषद शाळा आणि नेहरू विद्यालय येथे स्वच्छतेचा कोपरा तयार केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी तिन्ही शाळांमध्ये प्रथमोपचार पेटी उपलब्ध करून दिली, ज्यामध्ये डेटॉल, कॉटन, बँडेज पट्टी, हॅण्ड वॉश, आवश्यक औषधे आणि मुलींसाठी सॅनिटरी पॅड यांसारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश होता.

स्वच्छतेचा कोपरा म्हणजे काय, याबद्दल मार्गदर्शन करताना प्रा. सिद्धांत ढोके यांनी सांगितले की, स्वच्छतेचा कोपरा हे शाळेतील स्वच्छता आणि आरोग्याशी संबंधित साहित्य ठेवण्याचे एक नियुक्त ठिकाण असते. यामध्ये




विद्यार्थ्यांच्या कार्यपुस्तिका, शिक्षकांच्या पुस्तिका, प्रथमोपचार पेटी, साबण, बादल्या, पाण्याचे मग, टॉवेल आणि इतर स्वच्छता साहित्य समाविष्ट असते.

कार्यक्रमात सोनाली भूते यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी वर्गखोल्यांच्या नियमित स्वच्छतेमुळे जंतू आणि आजारांचा प्रसार कसा रोखता येतो, यावर प्रकाश टाकला आणि शाळांमध्ये सकारात्मक वातावरण कसे तयार होते याची माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमिषा चौखंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नम्रता सोनोने यांनी केले. या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ललिता कुकडे, मनीष गोठे, पल्लवी दिवठे, वर्षा चंदनखेडे, साक्षी लोखंडे, कोमल मुळे, सानिका तुरे, विशाल उईके, नम्रता सोनोने, अश्विनी निवल आणि ललित जमोदकर यांनी विशेष सहकार्य केले.

# शिक्षकांच्या कल्याणासाठी जयंत आसगावकर यांचे योगदान-प्रिंटर वितरण समारंभ झाला यशस्वी




**सोलापूर । प्रतिनिधी**

पुणे विभागाचे विधान परिषदेचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी करमाळा तालुक्यातील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल झरे येथे प्रिंटर वितरण समारंभात उपस्थित राहून ४१ शाळांना प्रिंटरचे वाटप केले. हा कार्यक्रम श्री भैरवनाथ प्रतिष्ठान करमाळा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमात स्वयंअर्थ तत्त्वावर चालवण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संस्थापक अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी यांनी त्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात निवेदन दिले. यावेळी आमदार आसगावकर यांनी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत शासन दरबारी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. मी सामान्य आमदार असून, कोणत्याही शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्थाचालकांचा येणारा कॉल स्वीकारतो. 'एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व' हे माझे कामकाजाचे धोरण आहे, असे आमदार आसगावकर यांनी स्पष्ट केले.

प्राचार्य जयप्रकाश बिले यांनी त्यांच्या अध्यक्षीय मनोगतात शिक्षकांच्या प्रश्नांवर आमदार आसगावकर यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रशंसा केली, तसेच संस्थाचालक व शिक्षक खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक सचिन झाडबुके, नीळ, गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात संस्थेचे सचिव युवराज बिले, प्रा. राजेश शिंदे आणि तिन्ही तालुक्यातील मुख्याध्यापक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोरी चावरे व नम्रता पवार यांनी केले.

# राजे ग्रुप रंभापुराच्या वतीने नवरात्रोत्सव उत्साहात साजरा

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील रंभापुरा गल्लीमध्ये यावर्षीही सालाबादप्रमाणे देवीच्या नवरात्रोत्सवाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. सामाजिक उपक्रम राबवून नऊ दिवस विविध आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये विजेत्यांना बक्षिसे देण्यात येतात.

या उत्सवाच्या आयोजनासाठी मंडळाचे सर्व सदस्य अहोरात्र मेहनत घेत आहेत. मंडळाचे प्रमुख सदस्य अमर करंडे, संतोष सापते, महेश गोडसे, रामा करंडे, सुखदेव लष्कर, परशुराम तांबे, राहुल कवडे, बापूसाहेब तांबे पाटील, वसंत जाधव, बालाजी चव्हाण, नागेश दुधात, आकाश कवडे, सागर जाधव, प्रजोत करंडे, राजेंद्र दुधात, नितीन करंडे आणि सौरभ आवटे यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

या उत्सवात सहभागी होणाऱ्या स्थानिक नागरिकांनी देखील उत्सवाला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. मंडळाच्या या उपक्रमामुळे सामाजिक एकतेला बळ मिळाले असून,



करमाळा शहरातील उत्सवाच्या पद्धतीला एक नवा आकार मिळालेला आहे. मंडळाच्या सर्व सदस्यांच्या मेहनतीमुळे हा उत्सव आणखी यशस्वी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# रावगावच्या पं.जवाहरलाल नेहरू विद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**सोलापूर । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रावगाव (ता. करमाळा) येथील पं. जवाहरलाल नेहरू विद्यालयाला विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, निमगाव (टे) संस्थेने आदर्श शाळा पुरस्कार प्रदान केला आहे. या पुरस्काराने शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रविवारी (ता. ६) करमाळा येथील विकी मंगल कार्यालयात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. करमाळा विधानसभेचे आमदार संजय शिंदे आणि शिक्षण अधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांच्या हस्ते पं. जवाहरलाल नेहरू विद्यालयास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी शाळेच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी शिक्षक किरण परदेशी, भाऊसाहेब सरडे, प्रताप बरडे, अंजली लांडगे, सुरेश बरडे आणि दादा कांबळे हे मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, हा पुरस्कार शाळेतील प्रत्येक शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या समर्पणाचे फळ आहे. त्यांच्या योगदानामुळेच शाळा या उंचीवर पोहोचली आहे.

रावगावच्या पं. जवाहरलाल नेहरू विद्यालयातील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवतात. शाळेतील विद्यार्थी सामाजिक, शैक्षणिक, आणि राजकीय क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाची चमक दाखवत आहेत. शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शाळेला आदर्श शाळा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.यावेळी शाळेतील सुरेश (अण्णा) बरडे यांना आदर्श कर्मचारी म्हणून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमात गणेश (भाऊ) करे-पाटील, डॉ. महेंद्र कदम, अ‍ॅड. बाबुराव हिरडे, ह.भ.प. जयवंत नलवडे, गट शिक्षण अधिकारी आणि इतर मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मारोडा येथे भव्य नेत्र चिकित्सा शिबीर

# मुल तालुक्याच्या सर्वांगीण विकासासह सर्व सामान्यांच्या सेवेचा संकल्प-ना.सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जनतेचे आरोग्य उत्तम राहावे, दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिलो आहे. लोकांच्या आरोग्यासाठी सहकार्याचा हात पुढे करत दिव्यांग बांधवांना स्वयंचलित सायकलींचे वाटप, बालकांच्या हृदयाची शस्त्रक्रिया, ५० हजारांपेक्षा जास्त लोकांचे नेत्र चिकित्सा शिबिर, ३५ हजारांपेक्षा जास्त लोकांना चष्म्यांचे वाटप, आणि पाच हजारांपेक्षा जास्त लोकांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याचे सौभाग्य मिळाले आहे. मुल तालुक्याच्या सर्वांगीण विकासासह सर्वसामान्यांची सेवा करण्याचा संकल्प केला आहे, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

मारोडा येथे माता कन्यका सेवा संस्था, चंद्रपूर यांच्या माध्यमातून व ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून भव्य नेत्र चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सरपंच (मारोडा) भिकाजी शेंडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्याताई गुरनुले, चंदु मारगोनवार, प्रेमदास गेडाम, जयश्री वेलकेवार, नंदू रणदिवे, प्रियंका नरमलवार यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





मतदारसंघाच्या विकास साधतांना नागरीकांना अपेक्षित असलेली विकासकामे मार्गी लावली आहेत. मुल ते मारोडा रस्ता, कृषी महाविद्यालय, सिमेंट काँक्रिट रोड, मारोडा रेल्वे थांबा अशा विविध कामांची यशस्वी पूर्तता झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र उत्तम व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मारोडा गावाचे अधिक विकास साधण्यासाठी कृषी महाविद्यालयाची उभारणी केली जात आहे. प्रत्येक गावाच्या विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मारोडा येथील तलावाचे सौंदर्यीकरण, वाचनालय, महादेव मंदिराचा जीर्णोद्धार यासारख्या विकासकामांसाठीही निधी उपलब्ध केला जाईल, आणि प्रवेशद्वार (गेट) उभारणीसाठी वनविभागाच्या ताडोबा फाउंडेशनच्या माध्यमातून २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध केला जाणार असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले.

ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले, नेत्रचिकित्सा शिबिराच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे उत्तम करण्यात आली असून, मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरून मतदारसंघातील पाच उपकेंद्रांना विशेष मान्यता मिळवून दिली आहे. मुल येथील ग्रामीण रुग्णालय अत्याधुनिक करण्यात येत आहे. भोई समाजासाठी मच्छीमार कल्याणकारी महामंडळाच्या स्थापनेस मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. शबरी आवास, रमाई आवास, प्रधानमंत्री आवास योजना यामधील अनुदान १.३० लाखांवरून २.५० लाख रुपये केले गेले आहे. निराधार योजनेचे अनुदान ६०० रुपयांवरून १५०० रुपये वाढवले गेले आहे. रस्ते हे ग्रामीण विकासाची रक्तवाहिनी आहेत. ग्रामीण भागातील पाणंद रस्ते तसेच शहरातील मुख्य रस्ते उत्तम केले आहेत. मा. राज्यपाल महोदयांनी पोंभूर्णा क्षेत्रातील रस्त्यांच्या कामांचे कौतुक केले आहे, असेही ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. सर्व जाती-धर्मांच्या विकासासाठी कार्य केले असून, ५० वर्षांत न झालेली विकासकामे येत्या १० वर्षांत पूर्ण करण्यात आली आहेत. मारोडा वासीयांनी या विकासाची गंगा थांबू देऊ नये, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

---

# बहुजन संघर्ष सेनेचे तहसील कचेरी स्थलांतराच्या विरोधात भव्य निदर्शने

**सोलापूर । प्रतिनिधी**

मौलाली माळावर करमाळा तहसील कार्यालय बांधण्याच्या प्रस्तावाला विरोध दर्शवण्यासाठी बहुजन संघर्ष सेनेने करमाळा तहसील कचेरीसमोर भव्य निदर्शने केली. या आंदोलनाचे नेतृत्व बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांनी केले.




राजाभाऊ कदम यांनी आपल्या भाषणात इंग्रजांच्या काळात बांधलेली तहसील कचेरी अद्याप सुस्थितीत असल्याचे सांगून नवीन कचेरी बांधण्याचा निर्णय जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा असल्याचे म्हटले. त्यांनी मागणी केली की, तहसील कचेरीचे बांधकाम नव्याने करायचे असल्यास ते सध्याच्या जागेवरच व्हावे, कारण येथे प्रशस्त जागा उपलब्ध आहे.कदम यांनी आमदार संजय शिंदेंवर टीका करत, त्यांनी मागील पाच वर्षांत एकदाही जनतेसाठी आमसभा घेतली नसल्याचे सांगितले. तहसील कचेरीतील रखडलेली कामे आणि शेतकऱ्यांचे प्रस्ताव यावरही प्रशासनाने कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत, असे ते म्हणाले. मौलाली माळावर प्रस्तावित नवीन तहसील कचेरी दोन किलोमीटर दूर असून, या ठिकाणाच्या असुविधांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना धोका पोहोचू शकतो, असे निदर्शनात सांगण्यात आले.

या आंदोलनाचे निवेदन नायब तहसीलदार विजयकुमार लोकरे यांनी स्वीकारले आणि वरिष्ठांना कळवण्याचे आश्वासन दिले.या निदर्शनांमध्ये अंगद लांडगे, कालिदास कांबळे, भीमराव घाडगे, अतुल चव्हाण, अभिमान गायकवाड, रामभाऊ नलवडे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

---

# लोकमान्य इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाचे भव्य स्वागत

**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य इंग्लिश मीडियम स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत मोठा पराक्रम केला आहे. या उल्लेखनीय यशाच्या निमित्ताने संघाचे भव्य स्वागत करण्यासाठी उद्या, दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता रत्नमाला चौक, वरोरा येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



संघाच्या खेळाडूंनी आपल्या मेहनतीने आणि आत्मविश्वासाने शालेय क्रीडा स्पर्धेत हे यश मिळवले असून त्यांच्या या यशाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी सीनियर ज्युनिअर खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शक, हितचिंतक आणि लोकशिक्षण संस्था, वरोडा यांच्या वतीने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येत आहे. पालकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या पाल्याचा आनंद साजरा करावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

या विजयी संघातील खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे आहेत: ईश्वरी राऊत, वैष्णवी गुंतीवार, संचिता हजारे, राशी मांडवकर, वैष्णवी मिलमिले, तन्वी उमक, अनुराधा बोथले, कृष्णा कथडे, लावण्या केराम, श्रावणी चौधरी, मनस्वी श्रीरामे, आणि आदिश्री वेल्हे.व्हॉलीबॉल संघाच्या खेळाडूंनी दाखवलेले साहस आणि चिकाटी यामुळे वरोरा तालुक्यात आनंदाची लहर पसरली आहे.

---

# माना समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटीबद्ध-विरोधी पक्षनेते वडेट्टीवार

## कुकडहेटी येथे सामाजिक सभागृह बांधकामाचा भूमिपूजन सोहळा

**सिंदेवाही । प्रतिनिधी**

माना समाज हा पूर्वीच्या काळातील राज्यांचा वंशज असला तरी, मागील काही काळापासून या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक समस्यांकडे दुर्लक्ष झाले आहे. मात्र, हा समाज अतिशय प्रामाणिक व एकनिष्ठ आहे, आणि त्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटीबद्ध राहीन, असे प्रतिपादन विरोधी पक्षनेते आणि ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.





वडेट्टीवार सिंदेवाही तालुक्यातील कुकडहेटी येथे आयोजित माँ मानीकादेवी सामाजिक सभागृहाच्या (अंदाजित किंमत १ कोटी रुपये) भूमिपूजन सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमात त्यांनी माना समाजाच्या विकासासाठी आपली सदैव तत्परता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री डॉ. रमेशकुमार गजभे होते. विशेष अतिथी म्हणून गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे नवनिर्वाचित खासदार डॉ. नामदेव किरसान, डॉ. सतीश वारजुरकर, राहूल दडमल, विजय घरत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

वडेट्टीवार यांनी पुढे बोलताना समाजातील समस्यांवर भाष्य केले आणि माना समाजाच्या जात पडताळणीसारख्या अडचणी सोडविण्यासाठी आपले सर्वतोपरी प्रयत्न असतील, असे आश्वासन दिले. माना समाजाच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी एकजूट आवश्यक आहे. समाजातील बंधूंनी एकसंघ होऊन वज्रमूठ बांधल्यास समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे, असे ते म्हणाले. खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी माना समाजाच्या मुख्य समस्यांवर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. माजी राज्यमंत्री डॉ. रमेशकुमार गजभे यांनी आपल्या भाषणातून समाजाच्या विविध समस्यांवर चर्चा केली.कार्यक्रमाच्या उत्तरार्धात नवनिर्वाचित खासदार डॉ. नामदेव किरसान आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. माँ मानीकादेवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विश्वनाथ श्रीरामे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमास माना समाजाचे हजारोंच्या संख्येने बांधव उपस्थित होते.

---

# काँग्रेसच्या बुद्धिभेदाला बळी पडू नका-अ‍ॅड वाल्मीक निकाळजे





**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

काँग्रेसने वेळोवेळी संविधान आणि आरक्षणावर आघात केलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेले संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ असून, भारतीय लोकशाहीचा दीपस्तंभ आहे. कोणतेही पक्ष किंवा संघटन संविधानाच्या मूलभूत गाभ्याला धक्का लावू शकत नाहीत, असे प्रतिपादन ड. वाल्मीक निकाळजे यांनी श्रीरामपूर येथे आयोजित सामाजिक संवाद मेळाव्यात केले.

विवेक विचार मंचच्या वतीने आयोजित या मेळाव्याचे आयोजन हॉटेल आभा येथे करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ड. निकाळजे यांनी काँग्रेसवर संविधानाच्या ४२व्या घटनादुरुस्तीचा दाखला देत टीका केली. त्यांनी सांगितले की, आणीबाणीच्या काळात काँग्रेसने संविधानाचा गळा घोटण्याचा प्रयत्न केला होता, मात्र लोकशाहीवादी जनतेने इंदिरा गांधी यांच्या हुकूमशाहीला मोडून काढले.

राहुल गांधी यांनी विदेशात जाऊन आरक्षण संपवण्याचे वक्तव्य केल्याचे निकाळजे यांनी सांगितले. त्यांनी ३७० कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये अनुसूचित जाती-जमातींना पहिल्यांदाच राखीव जागा मिळाल्याचेही नमूद केले. या कार्यक्रमात विवेक विचार मंचचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक सागर शिंदे, उत्तर अहिल्यानगर जिल्हा संयोजक बेबीताई कांबळे, आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. निखिल आठवले यांनीही आपले विचार मांडले. त्यांनी संविधानाचे महत्त्व, समाजातील जातीय तेढ, नक्षलवादी हल्ले, आणि समाजाच्या एकतेसाठी संविधानाचे योगदान याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सोनाली काळे यांनी केले, तर सूत्रसंचालन सुरेश कालडा यांनी केले. या वेळी विविध सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

---

# महात्मा गांधी आणि शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**मूल । प्रतिनिधी**

मूल येथील माऊंट कॉन्व्हेन्ट अँड ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शाळेच्या मुख्याध्यापिका रिमा कांबळे तर विशेष अतिथी म्हणून शोध विचार वेध बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष आणि स्वच्छता मित्र गौरव शामकुळे हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक अस्पाक सय्यद,भूपेंद्र मोटघरे, वामन कवाडकर आणि सचिन वाढई हे मंचावर होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थिनी तन्वी भुरसे आणि किमया खोब्रागडे यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनावर भाषण सादर करत त्यांचे कार्य व विचारांवर प्रकाश टाकला. शिक्षिका प्रीती यामावर यांनी गीत सादर केले, ज्यामुळे कार्यक्रमातील उत्साह द्विगुणित झाला.मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना मोलाचे विचार दिले. विशेषतः स्वच्छता मित्र गौरव शामकुळे यांनी स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल भाषण दिले आणि उपस्थितांना स्वच्छता सायकल रॅलीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक ठरले.कार्यक्रमाचे संचालन कादंबरी दंडेवार, अदिती भोयर आणि तानिया मुरकुटे यांनी केले, तर आभार प्रदर्शनाने समारोप झाला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .